थोडक्यात...

सिद्धेश्वर मंदिरात आज महारुद्राभिषेक

मस्कावद, ता.रावेर, वार्ताहर । येथील रायभाना परिसरातील श्री ओम सिद्धेश्वर महादेव मंदिरात दिनांक १० जुलै रोजी वर्धापन दिनानिमित्त व गुरुपौर्णिमेनिमित्त नवरतनगिरी महाराज सांबरपाठ यांच्या व गादीपती महंत संत गणेशगिरी महाराज यांच्या प्ररणेने महादेव मंदिर परिसरात सकाळी सात वाजता महा रुद्राभिषेक सोहळा होणार आहे. तरी रुद्राभिषेक सोहळा व सकाळी नऊ वाजेपासून प्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे अवाहन पुजारी दिनेश प्रकाश सोनवणे यांनी केले आहे.

नागपूर येथील सामाजिक न्याय परिषदेत सहभाग

रावेर । नागपूर येथे नुकतिच राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद झाली. या परिषदेत जळगाव जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचाही सहभाग होता या परिषदेला जळगाव येथील सागर शिंदे, अरुण कराड, प्रा. संजय मोरे, माया मोरे, भारती कांबळे, पद्मा मेश्राम, विवेक बोंडे, डॉ. धनराज बावस्कर, डॉ. संदीप गाढे, मयूर कोळी, वैष्णवी मोरे, प्रज्ञारत्न मोरे, विकास सावळे, रंजना सावळे, उमेश सावळे, प्रा. अनिल सपकाळे, प्रा. योगिता सपकाळे, प्रा. स्नेहा सोनवणे, शोभा कोळी, ओम सावळे आदी उपस्थित होते

मालदाभाडी येथे गुरुवंदना कार्यक्रम

जामनेर । येथून जवळच असलेल्या न्यू इंग्लिश स्कूल, मालदाभाडी शाळेत गुरूपौर्णिमेच्या पुर्वसंधेला अनुलोम संस्था महाराष्ट्र या राज्यस्तरीय संस्थेतर्फे अनुगामी लोकराज्य महाभियान अंतर्गत गुरुवंदना कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात संस्थेतर्फे ईश्वर चौधरी जामनेर यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात गुरुंचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विविध खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची आकलनक्षमता कशी वाढते तसेच लेखन कौशल्याच्या माध्यमातून गुरुंचे महत्त्व विषद केले. या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी शाळेचे प्र. मुख्याध्यापक एस. आर. शिकोकारे, तर प्रमुख अतिथी म्हणून सौ. करुणा महाजन, अरुण पाटील होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विजय सैतवाल यांनी केले तर आभार नितीन पाटील यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी उमेश वखरे, प्रभाकर खवडे, गणेश पाटील, राजेंद्र कोळी, एन. जी पाटिल, राजेश मोरे, मनोज जैन यांनी परिश्रम घेतले.

विधीलिखित

सुरेशराव बोरकर, ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर. मो. : ९८५००१५५५८

गुरुवार, दि. ११ जुलै २०२५

-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-

मेष – अविवाहितांना स्थळे येतील.
वृषभ – सर्वच कार्यात अडथळे येतील.
मिथुन – संतती इच्छुकांना संततीचा लाभ होईल.
कर्क – मनात नको ते विचार येतील.
सिंह – आज आपण सर्वश्रेष्ठ कार्य कराल.
कन्या – आई सोबत पैसा सोबत येईल.
तूळ – धार्मिक कार्यात मग्न रहाल.
वृश्चिक – आर्थिक संपन्नता येईल.
धनू – सर्वकाही मनाप्रमाणे मिळेल.
मकर – नको त्या कामात गुंतून रहाल.
कुंभ – मनाप्रमाणे सर्व घडत राहील.
मीन – नशिब म्हणजे काय असते ते कळेल.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने वाढदिवसानिमित्त...

आ.अनिल पाटील यांची शैक्षणिक साहित्य तुला

■ **अमळनेर । प्रतिनिधी**

येथील अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने माजी मंत्री आ.अनिल भाईदास पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित समारंभात भर पावसात हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत बैलजोडी धारक शेतकऱ्यांना पोळा सणाचा बैल साज , मापडींना लॉकर किल्लीचे वाटप आ.अनिल पाटील, खा.स्मिता वाघ यांच्या हस्ते करण्यात आले तर आ.पाटील शैक्षणिक साहित्य तुला करण्यात आली.

आ.अनिल पाटील यांनी सांगितले की मतदारसंघ बागाईत होत नाही तोपर्यंत मी शेतकऱ्याची साथ सोडणार नाही. पुढील काळात पं.स, जि.प, न.प आमच्या ताब्यात द्या शेवटच्या घटकापर्यंत सर्व योजना पोहचवून विकास करून दाखवू . शेतकऱ्यांनी पोळा सण पारंपरिक पद्धतीने जरूर साजरा करावा पण शेतकरी आधुनिकतेकडे जावा कृषिसाक्षर व्हावा असे कार्यक्रम येणाऱ्या काळात बाजार समितीने राबवावे असेही आवाहन यावेळी सत्काराला उत्तर देताना आ.पाटील यांनी केले.

आ.अनिल पाटील व सौ.जयश्री पाटील यांची फटाक्यांच्या आतिषबाजीत व ढोलताशांच्या गजरात सपत्नीक मिरवणूक सजविलेल्या बग्गीवरून काढण्यात आली. आ.अनिल पाटील यांची शैक्षणिक साहित्य तुला करण्यात आली.सभापती अशोक पाटील यांनी प्रास्ताविकात सांगितले की, शैक्षणिक साहित्याचे वाटप तालुक्यातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शाळेत जाऊन करण्यात येईल तर आ.अनिल पाटील बाजार समितीसाठी नेहमीच लकी ठरलेले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली बाजार समिती कर्जमुक्त होऊन ५ कोटी शिलकी राहिलीआहे.विविध विकास कामे होताना यंदा समिती जिल्ह्यात क्रमांक १ व विभागात क्रमांक ३ झाली आहे. शेतकरी निवास मंजूर झाले असून शेतकऱ्यांना स्वस्त चविष्ट भोजन लवकरच उपलब्ध करून देऊ.एकमताने काम करणाऱ्या सर्व संचालकांसोबत काम करण्याचे भाग्य लाभल्याचे सांगत आ.अनिल पाटील यांनी पुन्हा मंत्री व्हावे अशा शुभेच्छा यावेळी सभापती अशोक पाटील यांनी दिल्यात.

याप्रसंगी सभापती अशोक पाटील, उपसभापती सुरेश पाटील व संचालक मंडळ,कर्मचारी वृंद यांचेकडून आ.अनिल पाटील यांचा भव्य सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन अमळनेर अर्बन बँकेचे व्हाईस चेअरमन रणजित शिंदे यांनी केले. आभार उपसभापती सुरेश पाटील यांनी मानले.

नवनिर्वाचित विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालक मंडळाचे सत्कार यावेळी करण्यात आले.यावेळी मंचावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक डॉ.अनिल शिंदे, डॉ.अशोक पाटील,भोजमल पाटील,समाधान धनगर, हिरालाल पाटील,प्रफुल्ल पाटील,सौ. सुषमा पाटील,सौ.पुष्पा पाटील,भाईदास भिल ,नितीन पाटील,प्रकाश वाणी,ऋषभ पारख,शरद पाटील, माजी जिल्हा बँक संचालिका सौ. तिलोत्तमा पाटील,सौ.रिता बाविस्कर,माजी संचालक अनिल शिसोदे, माजी नगराध्यक्ष विनोद पाटील,राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष भागवत पाटील,मुख्तार खाटिक ,जळगाव जि.गटसचिव पतसंस्थेचे चेअरमन विजय पाटील, शिवाजीराव पाटील,प्रा.सुरेश पाटील,गणेश भामरे,शितल देशमुख,हेमंत पवार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव डॉ.उमेश राठोड यांच्यासह कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी आलेल्या प्रचंड संख्येने उपस्थित शेतकऱ्यांमुळे अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे आवार फुलले होते.

मापाडींना स्वतंत्र लॉकर सुविधा

कृषी उत्पन्न बाजार समिती येथील शेकडो मापाडी काम करतात.अशा कामगारांसाठी आपले साहित्य,डबा व महत्वपूर्ण वस्तू ठेवण्यासाठी लॉकर उपलब्ध करून देण्यात आले असून मापाडी यांना वैयक्तिक लॉकरच्या किल्ल्या वाटप याप्रसंगी खा.स्मिता वाघ ,जयश्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आल्यात.

३००० शेतकऱ्यांना बैल साज वाटप

यावेळी मंचावर बैल जोडीधारक शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात शेतकरी सभासदांना पोळा सणासाठी बैलांचा साज वाटप शुभारंभ करण्यात आला. यात बैलजोडीसाठी आवश्यक विविध वस्तू,सजावट साहित्याची बॅग ३००० शेतकऱ्यांपर्यंत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांमार्फत घरपोच पोचविण्यात येणार आहे.

डोंगर कठोरा येथे आज गुरुपौर्णिमेचे आयोजन

■ **यावल । प्रतिनिधी**

महान हिंदु संस्कृतीची जोपासना आणि संवर्धन करण्याचे सर्वोच्च कार्य गुरु-शिष्य परंपरेमुळे साध्य झाले. अशा तेजस्वी गुरु-शिष्य परंपरेचे स्मरण करण्यासाठी आणि समाजामध्ये हिंदु राष्ट्र स्थापनेच्या कार्यासाठी प्रेरणा निर्माण करण्याकरिता सनातन संस्थेच्या वतीने यावर्षी उद्या १० जुलै रोजी देशभरात ६७ ठिकाणी गुरुपौर्णिमा महोत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीकृष्ण-अर्जुन, समर्थ-शिवराय, आर्य चाणक्य-चंद्रगुप्त, रामकृष्ण परमहंस-स्वामी विवेकानंद यांनी केलेल्या कार्यामुळे धर्मसंस्थापनेचे कार्य होऊन राष्ट्र उद्धाराचेही कार्य झाले. गुरूंची कृपा संपादन करण्याकरिता गुरूंचे धर्मसंस्थापनेचे म्हणजेच हिंदू राष्ट्र-स्थापनेचे कार्य आपण अंगीकारले पाहिजे. याविषयी सविस्तर विवेचन व्हावे, याकरिता सनातन संस्थेच्या वतीने खंडेराव महाराज मंदिर डोंगर कठोरा येथे गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात श्री व्यासपूजन आणि प.पू. भक्तराज महाराज यांचे प्रतिमापूजन (गुरुपूजन) केले जाईल. ङ्कआनंदप्राप्ती अन् रामराज्याची स्थापना यांसाठी साधनाफ्या विषयांवरही मान्यवर वक्त्यांचे मार्गदर्शन होणार आहे. विविध विषयांवरील आध्यात्मिक, राष्ट्र आणि धार्मिक ग्रंथविषयीचे ग्रंथप्रदर्शन, तसेच राष्ट्र-धर्म विषयक फलकप्रदर्शनही लावण्यात येणार आहे.

भविष्यकाळाचा वेध घेणारा वक्ता घडवा-चिमणराव

■ **पारोळा । प्रतिनिधी**

भविष्यातील वक्ता हा प्रवक्ताच घडवित असतो.त्यासाठी केलेली तयारी कधीही वाया जात नाही असे प्रतिपादन माजी आमदार चिमणराव पाटील यांनी कजगाव येथे केले. प्रवक्ता अकॅडमी कजगाव नवीन शाखेच्या शुभारंभ प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

यावेळी प्रवक्ता अकॅडमी भविष्यातील वक्ता घडवण्याचं काम करेल आणि प्रवक्ता नाव ठेवून तुम्ही खरोखर त्या नावासारखे वक्ते भविष्यात घडवाल अशी मी आशा बाळगेल, इंग्रजी काळाची गरज आहे, आणि इंग्रजी प्रत्येक विद्यार्थ्याने भाषा म्हणून शिकले पाहिजे विषय म्हणून नाही विषय हा आपल्याला दरवर्षाला शिकवला जातो पण जर तुम्ही इंग्रजी ही भाषा म्हणून शिकलात तर तुम्हाला मराठी जशी आपण वाचतो, लिहितो, बोलतो व समजते तशा प्रकारे तुम्हाला इंग्रजीही समजायला लागेल बोलता येईल त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना माझी विनंती राहील की तुम्ही ज्या वर्गाला शिकत असाल त्या वर्गातच इंग्रजी भाषा म्हणून तुम्ही इंग्रजी शिकली पाहिजे आणि ते शिकवण्याचं काम प्रवक्ता अकॅडमी हे पूर्ण महाराष्ट्रात करीत असल्याचे मा. आ. चिमणराव पाटील यांनी सांगितले.

यावेळी विशाल पाटील अकॅडमीचे संचालक , एकनाथ पाटील , बी.के. पाटील ,अकॅडमीचे फाउंडर रवींद्र पाटील शशिकांत महाजन , विजय पाटील व सर्व संचालक उपस्थित होते सूत्रसंचालन जीवन मोरे यांनी केले विशाल पाटील यांनी आभार व्यक्त केले.

आषाढीनिमित्त सर्व सदस्यांनी केली वारकरी वेशभूषा

लायन्स क्लबचा पदग्रहण सोहळा ठरला आदर्श

■ **अमळनेर । प्रतिनिधी**

लायन्स क्लब अमळनेरचा ५७ वा स्थापना व पदग्रहण समारंभ सुभाष चौक येथे मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाला. विशेष म्हणजे आषाढी एकादशी निमित्त सर्व सदस्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा केली होती. तर त्यांनी अवयवदानाची सामूहिक शपथ घेत समाजासाठी झपाटून काम करण्याचा नवा संकल्प केल्याने कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले. हा कार्यक्रम सामाजिक सलोखा, संस्कृतीशी नाते आणि सेवाभावी कार्याच्या दिशेने एक प्रेरणादायी पाऊल ठरला.

सेवेचा संकल्प

लायन्स क्लबने जवखेडा येथील सानेगुरुजी शाळेतील पीयूष विजय ठाकूर या विद्यार्थ्याला वर्षभरासाठी शिक्षणासाठी दत्तक घेण्याचा निर्णय घेतला. त्याचा संपूर्ण खर्च क्लबकडून केला जाणार आहे.

या प्रसंगी नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, सचिव महेंद्र पाटील, कोषाध्यक्ष नितीन विनचुरकर यांनी पदभार स्वीकारला. कार्यक्रमास माजी जिल्हापाल गिरीश सिसोदिया, प्रादेशिक अध्यक्ष चेतन बर्डीया, झोन अध्यक्ष विनोद अग्रवाल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुख्य वक्ता म्हणून उपस्थित लेखक, अभिनेता आणि दिग्दर्शक अशोक सामेल यांनी आपल्या प्रभावी शैलीतून उपस्थितांना सेवेची, संस्कृतीची आणि समाजप्रेमाची प्रेरणा दिली.

या वेळी उपस्थित चांगलेच भारावून गेले. कार्यक्रमाची सांगता सेवा, निष्ठा आणि सामाजिक एकतेचा नवा संकल्प घेत करत करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डिगंबर महाले व नयना नवसारीकर यांनी केले.

पाळधीत ५१० रुग्णांची नेत्र तपासणी

■ **पाळधी । वार्ताहर**

जिपीएस मित्र परिवाराच्यावतीने पाळधी येथे आयोजित नेत्र तपासणी व मोफत मोतिबिंदू ऑपरेशन शिबिरास नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला शिबिरात सहभाग नोंदवत ५१० रुग्णांची नोंदणी केली. त्यापैकी २१० रुग्णांना पनवेल येथील सुप्रसिद्ध शंकरा नेत्र रुग्णालयात मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले.

या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे तपासणी, औषधे, ऑपरेशन, वाहतूक, नाश्ता व जेवण या सर्व सुविधा पूर्णपणे मोफत ठेवण्यात आल्या होत्या. कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेता अत्यंत शिस्तबद्ध व कौशल्यपूर्ण नियोजनातून शिबिर पार पडलं. हा उपक्रम पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या प्रेरणेतून, जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील आणि विक्रम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत राबविण्यात आला. शिबिराच्या यशामध्ये जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील आणि विक्रम पाटील, शंकरा नेत्र रुग्णालयाची तज्ञ टीम, डॉ. राहुल चौधरी, डॉ. राजेश कापसे, डॉ. विजय बामणे, डॉ. रुचिका जंगम, डॉ. अवंतिका रिकामे, डॉ. गुरुप्रित, डॉ. राहुल चौधरी, जीपीएस मित्र परिवार, शिवसेना युवासेनेच्या कार्यकर्त्यांनी शिस्तबद्ध आणि सेवाभावी वृत्तीने सहभाग घेतला.

> नेत्रदान म्हणजे जीवनदान असल्यामुळे गोरगरिबांच्या डोळ्यांत नव्या प्रकाशाचा किरण दिसावा. गावा - गावातील गोरगरीब जनतेला दृष्टी म्हणजेच नवीन जीवन मिळावं, हीच माझी खरी जबाबदारी आणि आनंद आहे. आरोग्यदायी समाजनिर्मितीसाठी अशा शिबिरांची शृंखला सुरुच राहील
>
> ■ गुलाबराव पाटील, पालकमंत्री

पहिल्याच केळीबागेचा पाडा गेला इराणला

■ **गुढे, ता भडगाव । वार्ताहर**

येथील आदर्श शेतकरी सिव्हिल इंजिनिअर महेंद्र पंढरीनाथ महाजन या उच्च शिक्षीत युवा शेतकरी यांना मोठ्या शहरात चार आकडी पगाराची नोकरी सहज मिळवून शहरात स्थायिक होता आले असत. पण त्यांनी नोकरीत नोकर न राहता आपले मोठे बंधू आदर्श शिक्षक सुदाम पंढरीनाथ महाजन यांना सांगितले की मला नोकरी न करता शेती करायची अशी इच्छा व्यक्त केली आणि कोरोना काळात त्यांनी शेतीत लक्ष घातले.

आईच्या सोबत शेताची कास धरत मोठ्या आवडीने शेताची वाट धरली त्यावेळी देखिल पहिल्यादाच २०गुंठयात ४ लाखाची सिमला मिरचीचे भरघोस विक्रमी उत्पन्न घेत उभारी घेतली आणि शेतीची आवड व गोडी वाढली आणि पक्के मनाशी ठाम होत आता आई सोबत काळ्या आईची सेवा करायची असा संकल्प आणि कास धरली आणि पारंपारिक शेती न करता आधुनिक पध्दतीने पहिल्यादाच पूर्वा कंपनीचे कुंदन महाजन व भाऊ सुदाम महाजन यांच्या मार्गदर्शानाखाली केळीचा पहिला प्रयोग केला यात बागेचे नियोजन,व्यवस्थापन करुन निर्यातक्षम केळीची बाग मोठ्या कष्टाने हिंमतीने केली आणि पहिल्याच प्रयत्नाला मोठे यशयश मिळाले आणि पहिल्यांदाच केळीची लागवड यशस्वी ठरवत पहिलाच केळीचा बाग तोही थेट इराण देशात पाठवला असून काहीजण शेतीच्या नावाने तोंड मोडणाऱ्यांना या युवा उच्च शिक्षित इंजिनिअर यांचा शेतीच्या कष्टाला फळ आले तो नक्कीच प्रेरणा व ऊर्जा देणारा ठरेल महाजन परिवाराने पहिल्याच प्रयत्नात केळी थेट इराणला पाठवली म्हणून अभिनंदन व कौतुक होत आहे.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, ई-७/९, व.वा.मार्केट (गोलाणी मार्केट) दुसरा मजला, नवी पेठ जळगाव येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार २२११०१. **RNI.No. 68337/1997** पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. **JAL./123/2018-2020** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)